महाराष्ट्र शासन - सार्वजनिक आरोग्य विभाग
राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय,
डॉ. नायडू सांसर्गिक रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे -४११ ००१

उपसंचालक आरोग्य सेवा
(आमाजिआ)
तथा उपमुख्य निबंधक
(जन्म व मृत्यू) महाराष्ट्र राज्य

संकेतस्थळ - arogya.maharashtra.gov.in
कार्यालय ☎ :- ०२० - २६०५९५३०
कायदा विभाग ☎ :- ०२० - २६०५८६१०
नानोप विभाग ☎ :- ०२० - २६०५८२९२
ई-मेल crs_d83@yahoo.com

**आरोग्य सेवा**

जा.क्र.आमाजिआ/कक्ष-८३/जन्म-मृत्यू नोंदणी /२०२११-७७ /१९
दिनांक:- ३१/ १२ /२०१९

प्रति,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक, जन्म व मृत्यू,
जिल्हा परिषद .............(सर्व)

२) कार्यकारी आरोग्य अधिकारी तथा निबंधक, जन्म व मृत्यु,
बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.

३) वैद्यकीय आरोग्य अधिकारी तथा निबंधक, जन्म व मृत्यु,
महानगरपालिका,.....(सर्व)

विषय :- **जन्म-मृत्यू नोंदणी घटनांच्या नोंदीबाबत.**

संदर्भ - महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग,
अधिसूचना दिनांक १२/०४/२०१८

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने शासनाच्या अधिसूचनेनुसार राज्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्थेच्या संस्था प्रमुखांना निबंधक, जन्म व मृत्यू म्हणून घोषीत करण्यात आले आहे. त्यांनी आपल्या रुग्णालयाच्या इमारतीत व रुग्णालयीन परिसरात (सीमा भिंती आत) घडणा-या जन्म-मृत्यू घटनांची नोंदणी करुन संबंधीत प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. नोंदणी करण्याच्या अगोदर संबंधीत नातेवाईकांकडून जन्म व मृत्यू अहवाल (नमुना क्रं.१ व २) मधील सर्व माहिती बिनचूक भरण्याविषयी या पत्रासोबत जोडलेल्या सूचनाचे फलक निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी कार्यालयाच्या दर्शनिय भागात लावण्याबाबत आपल्या कार्यक्षेत्रातील नवनियुक्त निबंधक, जन्म-मृत्यू यांना कळविण्यात यावे व तसे या कार्यालयास अवगत करावे.

(डॉ.एन.डी.देशमुख)
उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजीआ)
तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यू
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत सविनय सादर :

१) मा.आयुक्त तथा संचालक आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) मा.संचालक, जनगणना कार्यालय, महाराष्ट्र राज्य मुंबई.
३) मा.संचालक आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म व मृत्यु, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) मा.संचालक, आरोग्य सेवा मध्यवर्ती इमारत, पुणे-१.

प्रत - जिल्हा शल्यचिकीत्सक तथा निबंधक, जन्म व मृत्यु, जिल्हा रुग्णालय, सर्व.....

*F:83/Circular.2019*

# जन्म व मृत्यू अहवाल (अहवाल क्रं.१ व २) भरण्याबाबत नातेवाईकांना सूचना

१. जन्माची नोंद करण्यासाठी जन्म अहवाल (नमुना क्रं.१) नातेवाईकांनी सुवाच्य हस्ताक्षरात भरावा. अहवालाच्या खाली त्यांनी स्वाक्षरी करावी अथवा अंगठा उमटवावा.

२. मृत्यूची नोंद करण्यासाठी मृत्यू अहवाल (नमुना क्रं.२) नातेवाईकांनी सुवाच्य हस्ताक्षरात भरावा अहवालाच्या खाली त्यांनी स्वाक्षरी करावी अथवा अंगठा उमटवावा.

३. अहवाल क्रं.१ किंवा २ मध्ये जी माहिती भरावयाची आहे. ती नातेवाईकांनी जबाबदारीने व अचुक भरावी. त्यावरुन जन्माची अथवा मृत्यूची नोंद होऊन जन्म-मृत्यू दाखला/प्रमाणपत्र मिळते.

४. जन्म अहवाल भरताना बाळाच्या नावासह तो भरावा म्हणजे जन्म प्रमाणपत्र दाखला नावासह मिळेल.

५. जन्म अथवा मृत्यू अहवाल भरुन आरोग्य संस्था प्रमुखांना (डॉक्टरांना) जन्म अथवा मृत्यू घडल्यापासून २१ दिवसांच्या आत द्यावा.

६. जन्म-मृत्यू प्रमाणपत्र/दाखला नातेवाईकांनी जन्म-मृत्यूची माहिती संस्था प्रमुखांना (डॉक्टरांना) दिल्यानंतर ३० दिवसांच्या आत घेऊन जावे.

७. जन्म-मृत्यू प्रमाणपत्राची/दाखल्याची पहिली प्रत विनामुल्य मिळेल. जास्त प्रतीसाठी शुल्क (फी) भरावे लागेल.